# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र.३

सभावृत्तांत

दिनांक ०६/०५/२०१६ दुपारी १२.०० वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे मे २०१६ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०६/०५/२०१६ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या “छत्रपती शाहू महाराज सभागृह” येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. अरुण मदन टाक | सभापती |
| २. | मा. श्री. प्रमोद रघुनाथ ताम्हणकर | सदस्य |
| ३. | मा. श्रीमती विमल रमेश काळे | सदस्या |
| ४. | मा. श्रीमती निता विलास पाडाळे | सदस्या |
| ५. | मा. श्री. विनोद जयवंत नढे | सदस्य |
| ६. | मा. श्रीमती आरती सुरेश चोंधे | सदस्या |
| ७. | मा. श्री.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे | सदस्य |
| ८. | मा. राजेंद्र गणपत जगताप | सदस्य |

------------------

याशिवाय, मा. चंद्रकांत खोसे, क्षेत्रीय अधिकारी, मा. मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. प्रमोद ओंभासे, कार्यकारी अभियंता, स्थापत्य, मा. रामदास तांबे, कार्यकारी अभियंता,पाणीपुरवठा, डॉ. सतीश गोरे, पशू वैद्यकीय अधिकारी, मा. नितीन देशमुख, उपअभियंता, विद्युत, मा. एल.बी. जाधव, मा. विनय ओहोळ, मा. सुनिल एस. पाटील, उपअभियंता, स्थापत्य,मा. रवींद्र पवार, उपअभियंता, जलनि:सारण, मा. भाऊसाहेब साबळे, मा. राजेंद्र जावळे, उपअभियंता, पाणीपुरवठा, मा. पोरेडी एस.डी, उपअभियंता, स्थापत्य, मा. नितीन कळसकर, कार्यालयीन अधिक्षक, मा. अजय जाधव, मा. एस.एस. गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. रोकडे जयवंत, मा. वाकोडे ए.एम., मा. इदे ए.के. कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. व्हि. ए. पाडवी, मा. यु.एल. भालेराव, कनिष्ठ अभियंता, विद्युत, मा. ए. एस. नायडू, कनिष्ठ अभियंता, झोनिपू, मा. आर.बी. जगताप, कनिष्ठ अभियंता, नगररचना, मा. बी.जे. मोरे, कनिष्ट अभियंता, उद्यान, मा. निलेश दाते, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. गेंगजे, क्रीडा निरीक्षक, मा.ए.टी. सोनवणे, मा. आर.एम. सौदाई, आरोग्य निरीक्षक, मा. मोरे सी.सी. हॉर्टीकल्चर सुपरवायझर, मा. सटाले, उद्यान सहाय्यक, मा. एम.एस. कदम, मा. एम.पी. सुभेदार, अतिक्रमण निरीक्षक, इ. अधिकारी उपस्थित होते.

**मा. सचिव , सभा शाखा** :- मागील सभा कार्यपत्रिका क्र. १५, माहे मार्च २०१६ ची दिनांक ०४/०३/२०१६ व कार्यपत्रिका क्र. १, माहे एप्रिल २०१६ ची विशेष सभा दिनांक ६/४/२०१६ व कार्यपत्रिका क्र. २ दिनांक २९/४/२०१६ रोजीचे विशेष सभांचे सभावृत्तांत कायम करणे

**मा.सभापती** :- मागील सभा कार्यपत्रिका क्र. १५ माहे मार्च २०१६ ची दिनांक ०४/०३/२०१६ व कार्यपत्रिका क्र. १ माहे एप्रिल २०१६ ची विशेष (सभापती निवड) सभा दिनांक ६/४/२०१६ व कार्यपत्रिका क्र. २ दिनांक २९/४/२०१६ रोजीचे (आरोग्य विभागाशी संबंधित) विशेष सभांचे सभावृत्तांत कायम करणेस मान्यता देणेत येत आहे.

ड प्रभाग समिती कार्यपत्रिका क्र. ३ वरील विषयांवर खालीलप्रमाणे मंजुरी देणेत आली.

ठराव क्र. ४ विषय क्र. १

दिनांक ६/५/२०१६ विभाग : स्थापत्य

सुचक: मा. अनिता मच्छिंद्र तापकीर अनुमोदक : ----

संदर्भ : मा. अनिता मच्छिंद्र तापकीर यांचा दिनांक २९/४/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४७ मधील मयुरी रेसिडेन्सी मधील साईसदन येथे डी.पी. प्रमाणे रस्ता उपलब्ध असुन मयुरी रेसिडेन्सी येथील साईड मार्जिन साठी रस्ता उपलब्ध असुन सदर रस्ता साईसदन ते आनंद हॉस्पिटल पर्यंत रस्ता वळवून दुरुस्त करणेचा प्रस्ताव तहकुब करण्यात येत आहे.

------------

सन्मा. सदस्य व मा. सभापती यांचे मान्यतेने बैठकीमध्ये खालीलप्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्र. १** : पिंपरी प्रभाग क्र. ४३ पिंपरी येथील एम. जी. रोड , मेन बाजार बी ब्लॉक २४ व २५ (गुरुद्वारा) येथील चौकास " बाबा उत्तम सिंघ चौक" असे नामकरण करणे व त्या ठिकाणी महापालिकेच्या वतीने " बाबा उत्तम सिंघ चौक" म्हणुन नामफलक लावणे

**विषय क्र. २** : मनपाचे काळेवाडी फाटा ते देहु आळंदी रस्ता चिखली या बीआरटीएस रस्त्यावर पवना नदीवर पुल बांधणेत आला आहे. सदरचे पुलास " कै. रघुनाथ नखाते पुल" असे नामकरण करणे.

**विषय क्र.** ३ : एम.एम. शाळेसमोरील बीआरटी चौकात नागरीक व विद्यार्थ्यांसाठी भुयारी मार्गाचे नियोजन केले व ते काम होत आले आहे. सदर भुयारी मार्गाचे नामकरण "महाराष्ट्र भुषण "डॉ. श्री. नानासाहेब उर्फ नारायण विष्णु धर्माधिकारी" असे करणे.

सन्मा. सदस्य व मा. सभापती यांचे मान्यतेने बैठकीमध्ये दाखल करुन घेणेत आलेल्या ऐनवेळच्या विषयांवर खालीलप्रमाणे मान्यता देणेत आली.

ठराव क्र. ५ विषय क्र. २

दिनांक ६/५/२०१६ विभाग : स्थापत्य विभाग

सुचक :मा.अरुण मदन टाक अनुमोदक : मा. नीता विलास पाडाळे

संदर्भ : मा. अरुण मदन टाक यांचेकडील दिनांक ६/५/२०१६ रोजीचा प्रस्ताव

पिंपरी प्रभाग क्र. ४३ पिंपरी येथील एम. जी. रोड , मेन बाजार बी ब्लॉक २४ व २५ (गुरुद्वारा) येथील चौकास " बाबा उत्तम सिंघ चौक" असे नामकरण करणे व त्या ठिकाणी महापालिकेच्या वतीने "**बाबा उत्तम सिंघ चौक**" म्हणुन नामफलक लावणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

-----------------

ठराव क्र. ६ विषय क्र. ३

दिनांक ६/५/२०१६ विभाग : स्थापत्य विभाग

सुचक :मा. विमल रमेश काळे अनुमोदक : मा. आरती सुरेश चोंधे

संदर्भ : मा. विमल रमेश काळे यांचेकडील दिनांक ६/५/२०१६ रोजीचा प्रस्ताव

मनपाचे काळेवाडी फाटा ते देहु आळंदी रस्ता चिखली या बीआरटीएस रस्त्यावर पवना नदीवर पुल बांधणेत आला आहे. सदरचे पुलास " **कै. रघुनाथ नखाते पुल**" असे नामकरण करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

-----------------

ठराव क्र. ७ विषय क्र. ४

दिनांक ६/५/२०१६ विभाग : स्थापत्य विभाग

सुचक :मा. नीता विलास पाडाळे अनुमोदक : मा. विनोद जयवंत नढे

संदर्भ : मा. नीता विलास पाडाळे यांचेकडील दिनांक ६/५/२०१६ रोजीचा प्रस्ताव

एम.एम. शाळेसमोरील बीआरटी चौकात नागरीक व विद्यार्थ्यांसाठी भुयारी मार्गाचे नियोजन केले व ते काम होत आले आहे. सदर भुयारी मार्गाचे नामकरण "**महाराष्ट्र भुषण डॉ. श्री. नानासाहेब उर्फ नारायण विष्णु धर्माधिकारी**" असे करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.
सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

------------------

-------------------

मा. सभापती यांचे मान्यतेने सन्मा. सदस्यांनी सभेमध्ये खालीलप्रमाणे विविध विषयांवर त्यांचे मत व्यक्त केले.

<u>स्थापत्य विभाग</u>

**<u>मा. विनोद जयवंत नढे</u>** :-

प्रभाग क्र. ४६ व ४७ मधील १८ मीटर रस्त्याचे कामासाठी गेल्या वर्षी संयुक्तिक कारवाई स्थापत्य विभागाकडून करण्यात आली असुन प्रभाग क्र. ४७ मध्ये ही कारवाई करण्यात आली व जी घरे पाडण्यात आली तेथे अद्याप रस्ता झालेला नाही तसेच लोकही बेघर झाले आहेत. तरी रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे.

**<u>मा. कार्यकारी अभियंता स्थापत्य श्री. ओंभासे</u>** :- प्रभाग क्र. ४७ येथील रस्त्याचे कामासाठी अंदाजपत्रकात तरतुद करण्यात आली असुन सदर ठिकाणी डब्ल्युबीएम करुन घेणेत येईल.

<u>पाणीपुरवठा विभाग</u>

**<u>मा. विनोद जयवंत नढे</u>** : पाच सहा ठिकाणी कॉलन्यांमध्ये गढुळ पाण्याचा पुरवठा होत आहे. गंभीर समस्या आहे.

**<u>मा. कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा श्री. रामदास तांबे</u>** :- निविदेमध्ये दुरुस्ती करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. लाईन शिफ्ट करण्याची मागणी आहे. त्यानुसार दुसरीकडून तरतुद वर्गीकरण करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

**<u>मा. बापू उर्फ शत्रुघ्न काटे</u>** : पिंपरी चिंचवड शहरात एक दिवसाआड पाणी पुरवठा करण्यात येत असुन त्यानुसार पाणी कपात कशा पध्दतीने करण्यात येते. मागील वर्षापासुन पाठपुरावा करीत असलेल्या पिंपळे सौदागर येथील टाकीचे बांधकाम अद्यापही सुरु करण्यात आलेले नाही.

**<u>मा. कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा श्री. रामदास तांबे</u>**:- पिंपरी चिंचवड शहरात पाणीपुरवठा कशा पध्दतीने करण्यात येत आहे याची माहिती उपस्थितांना दिली तसेच दिनांक ६/५/२०१६ रोजी चिंचवड येथे पाण्याची लेव्हल कमी असल्याने पिंपरी, पिंपळे सौदागर व सांगवी भागांना पाणी पुरवठा झाला नाही. पिंपळे सौदागर येथील पाण्याच्या टाकीची निविदा पुढील आठवडयात प्रसिध्द होईल.

**<u>मा. राजेंद्र जगताप</u>** :- प्रभाग समिती बैठकीसाठी बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित राहत नाही तसेच क्रीडा विभागाकडून पिंपळे गुरव येथील जिम्नॅशियम हॉलचे साहित्याबाबत काय कारवाई करण्यात आली याचा खुलासा करण्यात यावा.

**<u>क्रीडा पर्यवेक्षक श्री. गेंगजे</u>** :- सदर विषयाचे नस्तीवर दक्षता व गुणनियंत्रण विभागाने जे आक्षेप काढले होते त्याबाबत आवश्यक तो खुलासा करुन नस्ती मध्यवर्ती भांडार विभागाकडे फेरसादर केली आहे.

**<u>क्षेत्रीय अधिकारी श्री. चंद्रकांत खोसे</u>** :- क्रीडा पर्यवेक्षक श्री. गेंगजे यांनी सदर प्रकरणी पाठपुरावा करुन आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करावी.

**<u>मा. राजेंद्र जगताप</u>** :- पशू वैद्यकीय विभागाचे कामकाजात सुधारणा आवश्यक आहे.

**<u>मा. सचिव तथा प्रशासन अधिकारी</u>** :- प्रशासकीय सुधारणा व गतिमानता अभियानांतर्गत १० कलमी कार्यक्रमामध्ये स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये ड प्रभागातील प्रभाग क्र.

५७ पिंपळे गुरव, पिंपळे निलख प्रभाग क्र. ५४ व पिंपरी वाघेरे प्रभाग क्र. ४५ पिंपरी वाघेरे या तीन प्रभागांना प्रभाग स्तरावरील स्वच्छतेविषयक कामासाठी अनुक्रमे प्रथम क्रमांक, द्वितीय क्रमांक व तृतीय क्रमांकांची बक्षीसे मिळाली. सदर बक्षीसे ज्या आरोग्य खात्याचे कर्मचा-यांच्या कामामुळे ड प्रभागास मिळाली आहेत त्या प्रभागातील गुणवंत कर्मचा-यांना शाल श्रीफळ देऊन सन्मा. नगरसदस्यांच्या हस्ते गौरविण्यात यावे .

त्यानंतर सर्व सन्मा. नगरसदस्य व नगरसदस्या यांचे हस्ते प्रभागातील १८ आरोग्य कर्मचा-यांना शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.

**मा. सभापती** :- आरोग्य विभागाच्या सर्व गुणवंत कर्मचा-यांचे मन:पुर्वक अभिनंदन करुन तसेच या पुढेही सर्व कर्मचा-यांनी अशाच प्रकारे आपले काम करण्याबाबत आवाहन केले. तसेच सर्व उपस्थित अधिकारी यांनी सन्मा. नगरसदस्य यांनी दिलेल्या सूचनांनवर आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत सूचना देऊन सर्व सन्मा. नगरसदस्य व अधिकारी वर्ग यांचे आभार मानुन माहे मे २०१६ ची बैठक संपलेचे जाहीर करतो.

सही/-
( अरुण मदन टाक )
**सभापती**
ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी ४११०१७

सही/-
**प्रशासन अधिकारी तथा**
सचिव (सभाशाखा)
ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/२४२/२०१६
दिनांक – १३ /०५/२०१६